Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- XI NOVEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# संत गाडगेबाबा महाराजांच्या शैक्षणिक विचारांची सद्य:परीस्थितीत उपयोगिता

डॉ.प्रा.किरण प्रकाश चिकाटे
मारिया अध्यापक महाविद्यालय,
तुकूम, चंद्रपूर

प्रस्तावना

आधुनिक भारताच्या जडणघडणीत ज्या संताचे महत्वपूर्ण योगदान आहे. त्यात संतश्रेष्ठ गाडगेबाबांचे योगदान शीर्षस्थ आहे. गाडगेबाबांनी मूर्तिमंत त्याग, बलिदान आणि समर्पणातुन आपल्या सामाजिक आणि विज्ञानवादी कार्यातून उच्च दर्जाची मूल्यशिकवण त्यांनी समाजाला दिला. समाजामध्ये अंधश्रध्देने थैमान घातले होते. अंधश्रध्दा, बुवाबाजी, जादुटोणा याला अवास्तव उधान आले होते. त्यामुळे अन्यायाच्या वणव्याला मोठ्या प्रमाणावर खतपाणी मिळाले या खूळचट प्रथांनी समाज ग्रासला होता. हे गाडगेबाबांना सहन झाले नाही. त्यांनी समाजातील अंधश्रध्दा निर्मुलनासाठी अवितरपणे कार्य केले. त्यांनी अंधश्रध्देचा नायनाट करण्यासाठी बुलंद आवाज उठविला. समाजातील या वाईट प्रथांना बंद करून समाजात परिवर्तनाची नवी लाट निर्माण केली. हे कार्य समाजोन्नतीला पोषक ठरले म्हणून खऱ्या अर्थाने करायचा झाल्यास संत गाडगेबाबांचे विचार हे आजही २१ व्या शतकात राहणाऱ्या आधुनिक मानवाला नितांत गरजेचे असून प्रत्येकाने गाडगेबाबचे विचार आत्मसात करणे काळाची गरज असून यशाच्या उत्तुंग शिखराकडे आगेकूच करण्यासाठी मौलिक आहेत. गाडगेबाबांच्या या क्रांतिकारी कार्यामुळे मानवी समाजाला एक दीपस्तंभ लाभला आहे.

विषयाचे महत्व आणि आवश्यकता

शिक्षण प्रक्रिया ही सामाजिक असल्यामुळे व्यक्तीला समाजाचा एक उपयुक्त घटक बनविणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. शिक्षण हे मौलिक असायला पाहिजे व्यावहारिक व उपयोगिता पूर्ण असायला पाहिजे शिक्षण हे सामाजिक विकास, सामाजिक कल्याण, सामाजिक नियंत्रण आणि विज्ञानाला सहाय्यक असावे तेव्हाच सद्य:परिस्थितीत राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधता येईल. संत गाडगेबाबाच्या दृष्ट्या व्यक्तिमत्वाची त्यांच्या विचारांच्या मुल्यांचा आदर्श त्याच्या कार्यातून जाणीव भावी पिढीला होणे ही आजच्या काळाची गरज आहे. त्यांच्या या कार्य कर्तुत्वाचा आदर्श डोळयासमोर ठेवूनच सद्य:परिस्थितीत समाजाच्या सर्वांगीण विकास साधता येईल म्हणून संशोधीकेने खालील विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाचा विषय :

संत गाडगेबा महाराजांच्या शैक्षणिक विचारांची सद्य:परिस्थितीत उपयोगीता.

कार्यात्मक व्याख्या

संत : समाजाला योग्य ते मार्गदर्शन करणारे निस्वार्थी महारापुरूष म्हणजे संत

शिक्षण : मानवाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.

उपयोगिता : फलप्राप्ती की योजना सुसहय जीवन जगण्यासाठी उपयुक्त पडणारी योजना, जीवन वर्तनाची फलप्राप्ती.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१.संत गाडगेबाब महाराजांच्या शैक्षणिक विचाराचा शोध घेणे.
२.सद्य:परिस्थितीत संत गाडगेबाबांच्या शैक्षणिक विचारांची उपयोगिता अभ्यासणे.

३.सद्य:परिस्थितीत शिक्षणातून संत गाडगेबाब महाराजांच्या शैक्षणिक विचाराद्वारे सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे.

परीक्षेत्र व्याप्ती व मर्यादा

संत गाडगेबाबा महाराजांवर आधारित असलेल्या विविध ग्रंथाचा नियतकालीकांच्या आणि साहित्याचा उपयोग करण्यात येईल. प्रस्तुत संशोधन हे संत गाडगेबाबा महाराजांच्या विचारापुर्तेच मर्यादित राहील.

संशोधनाची पध्दती

संशोधनासाठी घेतलेल्या विषयाचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची साधने

संशोधनामध्ये संत गाडगेबाबाच्या विचारावर आधारित असणाऱ्या विविध ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालीके या दुय्यम स्त्रोत साहित्याचा उपयोग संशोधनाची प्रमुख साधने म्हणुन करण्यात येईल.

माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वेचन

१. संत गाडगेबाबा महाराजांच्या शैक्षणिक विचाराची शोध घेणे :—

संत गाडगेबाबा यांच्या शैक्षणिक विचारणा अभ्यासले असता त्यांच्या मते शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. जीवन चांगले, यशस्वीरित्या जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अन्यथा व्यापारी ढोंगी साधू, धर्मपदेश करणारे लोक, कर्मकांडत फसविणारे लोक अशिक्षितांचा फायदा घेतील आणि मुठभर लोक समाजावर राज्य करतील म्हणुन शिक्षणाद्वारे समाजावे नियमन होणे गरजेचे आहे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक ज्ञान प्राप्त झाल्यास प्रत्येक व्यक्तीला नियंत्रणाच्या आधारे जीवन जगता येईल. जनजागृती, जनकल्याण होईल. शिक्षणामुळे सामाजिक विषमता दूर करता येईल व विविध सामाजिक विकृतीला आळा बसेल. प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर होऊ शकेल.

२. सद्य:परिस्थितीत संत गाडगेबाबांच्या शैक्षणिक विचारांची उपयोगिता अभ्यासणे :—

सद्य:परिस्थितीत शिक्षणाला सरकारने फार महत्व दिले आहे. शिक्षण हे सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहे. शिक्षणाच्या उपयोग सामाजिक स्थरावर झाला पाहिजे तसेच स्त्रियांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता सरकार कटिबध्द पाउल उचलत आहे. शिक्षणात नवीन नवीन प्रयोग करून सरकार लोकांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा पाठपुरावा करीत आहेत. गाडगेबाबांच्या शिक्षणाविषयीचे विचार समाजात रूजविणे ही काळाची गरज आहे.

३. सद्य:परिस्थितीत शिक्षणातून संत गाडगेबाबा महाराजांच्या शैक्षणिक विचारामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे :—

संत गाडगेबाबांचे शैक्षणिक विचार सद्य:परिस्थितीत समाजाला मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या विचारामुळे सामाजिक बांधिलीची जाणीव जनसामान्यांना निश्चित होत आहे. आधी करावे मग सांगावे हे सांगत त्यांनी अज्ञानी समाजाला सावध करण्यासाठी स्वावलंबन, शिस्त, स्वच्छेतेचे महत्व आपल्या कीर्तनातून स्पष्ट केले. प्रपंचात कर्तव्याची जाणीव देऊन सेवा धर्म सांभाळण्यासाठी संदेश दिला. तसेच पशुपालन, भूतदया इत्यादीचे महत्व स्पष्ट केले. कुटुंबाचा नाश हो तसेच पशुपालन, भूतदया इत्यादीचे महत्व स्पष्ट केले. कुटुंबाचा नाश होऊ नये म्हणून मोह, लोभ आणि व्यसन सोडण्यासाठी वरवर उपदेश केला.

निष्कर्ष :–

१.भावी जीवन यशस्वीरित्या जगण्यासाठी व समाज परिवर्तन घडवून आणण्याकरिता सर्वांसाठीच शिक्षण आवश्यक आहे.

२. शिक्षणामुळे जनकल्याण व जनजागृती होते.

३.समाजातील विषमता, विकास आणि विकृती दूर करण्याकरिता योग्य आवरणाची जान शिक्षणाद्वारे येऊ शकते.

४.शिक्षणाद्वारे स्वावलंबन, जीवनमूल्य आणि स्वतंत्रता समाजात येते.

५.प्रेम, सेवा, स्वच्छता, त्याग, नम्रता, समता आणि बंधुता या सप्तसोपनाची जाणीव निर्माण होते.

६.शिक्षण घेतल्यामुळे आर्थिक उन्नती होऊन समाजातील विषमता दूर करता येणे शक्त होते.

७.देशातील दारिद्रय, अंधश्रध्दा, जातीप्रथा, अस्पृश्यता, शोषण आणि व्यसनहीनता दूर करण्यासाठी धर्माचा आधार घेऊन समाज व्यवस्थेत सुधारणा करण्याची असलेली गरज आणि अनिवार्यता कीर्तनाद्वारे लोकांपर्यंत पोहचली.

८.शारीरिक स्वच्छते सोबतच मानसिक स्वच्छतेलाही तेवढेच महत्व आहे.

९.समाजातील स्त्री हा घ्ताक्भूविध कारणामुळे अशिक्षित व वंचित असल्यामुळे त्यांना शिक्षण देणे अतिशय महत्वाचे आहे. याबाबत कीर्तनातून जागृती निर्माण केला.

१०.समाजातील प्रत्येक घटकाला आत्मनिर्भार्ब्रून राष्ट्राला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ सूची –

१.अहेर हिरा १९९५ उदयोन्मुख भारतीय समजती शिक्षण व शिक्षक नागपूर, विद्या प्रकाशन

२.कडवे, पांडुरंग बालाजी १९९४ संत गाडगे महाराज पंढरपूर, गणपतराव गांगण

३.दखने, रामचंद्र १९९१ कर्मयोगी गाडगेबाबा प्रकाश विश्वासराव

४.प्रायार्च भागत रा.तु. १९९८ ‘लोकसंत गाडगे महाराज पुणे’

५.भितांडे वि.रा. २००६ शैक्षणिक संशोधन पध्दती पुणे, नित्य नूतन प्रकाशन